# प्रेरणेचा प्रवास – वैयक्तिक ते सामाजिक



प्रिय मित्र-मैत्रिणींनो माझं नाव अमृत बंग. मी गडचिरोलीला असतो आणि गेली १२ वर्ष मी निर्माण या उपक्रमात काम करतोय. आज मला तुमच्यासोबात दोन मुख्य गोष्टी बोलायच्या आहेत. एक म्हणजे माझ्या स्वतःच्या कामामागची जी काही प्रेरणा आहे ती तुम्हाला सांगावी असा एक उद्देश्य आहे आणि त्याच्यासोबत आपल्यातला प्रत्येक जण एक तरुण व्यक्ती म्हणून सामाजिक बदल करायला योगदान कसं देऊ शकतो व ते का करावं या विषयीदेखील आमचा जो काही विचार गेल्या काही वर्षांमध्ये संपृक्त झालाय तो तुमच्याशी बोलावा असा माझा आजचा प्लॅन आहे.


सर्व प्रथम माझ्या विषयी अगदी थोडक्यात सांगतो. मी गडचिरोलीलाच शिकलो. दहावी पर्यंत शाळेत गेलो नाही. बऱ्यापैकी होम- स्कुल्ड होतो आणि त्यामध्ये माझी एक धारणा पक्की झाली की शिक्षण ही व्यक्तीची स्वतःची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे शाळा असोत, शिक्षक असोत, पुस्तकं असोत हे सगळे आपल्याला मदत करणारे घटक आहेत जे अतिशय महत्त्वाचे आहेत पण शिक्षण ही मात्र आपली स्वतःची प्राथमिक जबाबदारी आहे. ती दुसऱ्यांवर किंवा कोचिंग क्लासेसवर ढकलून मी मात्र नामानिराळा राहतो असं करून आपल्याला चालणार नाही. आणि जेव्हा शिक्षणाला आपण परीक्षांच्या कचाट्यातून मुक्त करतो आणि केवळ परीक्षेपुरतं शिकायचं असं नाही तर त्याहून अधिक म्हणजे मुळात मजा येते, आनंद येतो, जगाविषयी समजून घेण्यात आपल्याला आनंद लाभतो. यासाठी जर आपण शिकायला लागलो तर ती एक मोहक आणि मुक्त करणारी प्रक्रिया बनते.




मी आज तुम्हाला हे शब्दांमध्ये सांगू शकतोय, कदाचित दहावीपर्यंत मला हे शब्दांमध्ये नसतं मांडता आलं पण हे मात्र मी जरूर म्हणेन की माझा जो अनुभव होता त्या काळातला तो अगदी याला साधर्म्य साधणारा होता.

मला आठवतं की माझ्या बाबांनी एकदा मला एक खूप सुंदर सूत्र सांगितलं होतं. ते मला असं म्हणाले होते की सहसा आपण म्हणतो की वाचाल तर वाचाल, वाचणार नाही तर कसं तू परीक्षेत फेल होशील, हे होईल, ते होईल. जणू काही वाचण्यासाठी भीती हीच प्रेरणा. अपयशाची भीती आणि जर अपयशी व्हायचं नसेल तर वाचा. अशा प्रकारे आपण नेहमी वाचण्याकडे आणि शिक्षणाकडे बघतो. तर बाबा मला एकदा गमतीत म्हणाले होते की, “अरे वाच वाच नाहीतर असाच पास होत जाशील”. तर तो एक सुंदर मानसिक बदल होता. की परीक्षेपुरतं किंवा परीक्षेच्या ताणासाठी आणि पास होण्यासाठी मला नाही वाचायचं आहे. तर मला वाचायचं आहे कारण वाचन हे अंतर्निहितपणे आनंददायी आणि स्वतःला प्रगल्भ करणारी प्रक्रिया आहे. इथे मी उल्लेख वाचनाचा जरी केला तरी ती गोष्ट सगळ्याच शिक्षणाला लागू होते. त्यामूळे मला असं वाटतं की ती गोष्ट माझ्यासोबत राहिली आहे. पुढे भारतात अभियांत्रिकीचं शिक्षण आणि अमेरिकेमध्ये व्यवस्थापनाचं शिक्षण घेतलं. पण या सगळ्या प्रवासामध्ये, औपचारिक शिक्षणाच्या पलीकडे प्रत्यक्ष जीवनात काम करून मी जे काही शिकलो आणि रोजचं वाचन स्वतःचं स्वतः करून मी जे काही शिकलो त्यामध्ये मला असं वाटतं हा मानसिक बदल फार महत्त्वाचा होता.

माझी तुम्हा सगळ्यांना म्हणूनच ही विनंती आहे की आपल्या शिक्षणाचं सुकाणू आपण आपल्या हातात घ्यायला पाहिजे, त्यासाठी अख्ख जग हे आपलं विद्यापीठ असलं पाहिजे आणि जिथून ज्या व्यक्तीकडून, ज्या पुस्तकातून, ज्या अनुभवातून आपल्याला जे चांगलं शिकता येतं, अधिक प्रगल्भ होता येतं ते आपण बघायला पाहिजे. केवळ परिक्षांपुरता शिक्षणाचा विचार नसावा.




शिक्षणाच्या अनुषंगाने दुसरा एक मुद्दा सांगायला पाहिजे जो खरं तर मी विनोबांच्या 'शिक्षण विचार' या पुस्तकातच वाचला. विनोबांनी त्या ठिकाणी एक उदाहरण घेतलं आहे. ते असं म्हणतात की जर आपण असा प्रश्न विचारला की अश्व म्हणजे काय तर आपल्याला उत्तर दिलं जातं की अश्व म्हणजे घोडा. त्यामध्ये विनोबा फार सुंदर म्हणतात की घोडा हा अश्वाचा निव्वळ समानार्थी शब्द आहे. पण घोडा म्हणजे अश्व नाही. अश्व वा घोडा या शब्दाचा अर्थ तिथे बाहेर तबेल्यात बांधून ठेवलेला आहे असं ते म्हणतात. किती सुंदर आहे बघा. जो कुठला प्राणी ज्याला चार पाय आहेत, जो खूप जोरात धावतो, ज्याची सहा एक फूट उंची आहे, ज्याला कदाचित चणे फुटाणे किंवा हरभरे खायला आवडतात, ज्याला छोटीशी आयाळ आहे, वगैरे वगैरे, त्याचे पूर्ण वर्णन करायला मला अवघड जातं म्हणून मी याला घोडा किंवा अश्व असं काहीतरी छोटंसं नाव चिकटवलं. पण घोडा किंवा अश्व हे वास्तव नाही. वास्तव बाहेर आहे. त्यामुळे मला असं वाटतं की आपल्या शिक्षणाच्या एकूणच अभ्यासक्रमांत ही एक मोठी मर्यादा राहून जाते की शिक्षण हे केवळ चार भिंतीत मर्यादित आणि बंदिस्त होऊन जातं. याच्यापलीकडे जीवनातल्या व प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून आणि लोकांसोबतच्या संवादातून आपण जे मिळवतो ते खरं शिक्षण.

बऱ्याचदा आपली अशी चर्चा होते की शिक्षण हे जीवनासाठी परिपक्व बनवणारं असावं, त्यातून मुलामुलींना रोजगाराचं कौशल्य मिळावं जेणेकरून ते चांगलं जीवन जगू शकतील. म्हणजेच जीवनासाठी शिक्षण, जीवनाला लक्षात ठेवून शिक्षण, अशा पद्धतीने आपण बोलतो. या सगळयांमध्ये जीवन आणि शिक्षण या दोन जणू भिन्न गोष्टी आहेत आणि शिक्षण हे जीवनासाठी तयार केलेलं एक द्वैत आहे असं आपण कल्पिले आहे. विनोबा मात्र एक पाऊल पुढे जातात. ते म्हणतात की असं द्वैत अस्तित्वात नाही. जीवन हेच शिक्षण. मला असं वाटतं कदाचित आजपर्यंत भारताच्या भूमीतून पैदा झालेला शिक्षणाच्या क्षेत्रातला हा सगळयात क्रांतिकारी विचार असावा. एकदा याची प्रगल्भता कळाली तर त्यामुळे आपल्यावर जबाबदारी तर येते पण अर्थातच संधी पण प्राप्त होते. म्हणजे शिक्षणासाठी अमुक ठिकाणीच गेलं पाहिजे, तमुक पदवीच घेतली पाहिजे, अशी अनिवार्यता आपल्यावर राहत नाही. तर माझं रोजचं जगणं, सकाळी उठल्यापासून मी काय करतो, माझ्या कामात काय करतो, कुठल्या लोकांसोबत वेळ घालवतो, काय वाचतो, कुठल्या प्रकारच्या मुद्द्यांवर चिंतन करतो, माझ्या कामाचा आउटपुट मी कसा काढतो, या सगळ्या गोष्टी आणि आपलं शिक्षण हे एकसंध बनून जातं.

त्यामुळेच मला असं वाटतं शिक्षणाकडे बघण्याचा खंडीत दृष्टिकोन न ठेवता, जीवन हेच शिक्षण अशा दृष्टिकोनातून आपण काम करू शकलो तर आपल्या सगळयांसाठी अतिशय आनंददायी आणि उत्पादक गोष्ट असेल.


दहावीपर्यंत शाळेत न गेल्यामुळे खरंतर मला स्वतःचा सुकाणू स्वतः हाथी घ्यायची सवय लागली आणि त्याच्यातून एक प्रेरणा माझ्या मनामध्ये विकसित होत गेली की माझं स्वतःच्या बाबतीत शिक्षण कसं असावं आणि माझ्या संपर्कातले जे इतर लोक आहेत त्यांच्यासाठी शिक्षणाच्या कशा प्रकारच्या संधी उपलब्ध असाव्यात.

आता हाच धागा थोडंसं पुढे घेऊन मी जातो. मी जेव्हा अभियांत्रिकी महाविद्यालयात गेलो, तेव्हा मला स्वतःच्या बाबतीत देखील काही गोष्टी जाणवल्या आणि मला इतर अनेक तरुण मित्रमैत्रिणी जे वेगवेगळया महाविद्यालयांमध्ये होते त्यांच्याशी जेव्हा चर्चा व्हायची तेव्हा त्यांच्याही बाबतीत एक गोष्ट घडताना दिसली. ती काय? ती अशी की काही दुर्मिळ अपवाद वगळता, आपल्याकडचं बहुतांश महाविद्यालयीन शिक्षण हे मोठ्या प्रमाणात माहिती देतं, क्वचित प्रसंगी कौशल्य देतं, पण एक गोष्ट जवळपास कधीच देत नाही ती म्हणजे हेतू किंवा पर्पज.

मला मिळालेली माहिती किंवा कौशल्य (दुर्दैवाने ते कमीच मिळतं) याचा उपयोग मी कोणासाठी करू? कशासाठी करू? याचं उत्तर सहसा आपल्या नेहमीच्या शिक्षण पद्धतीमध्ये मिळत नाही. आणि जर ते आपण स्वतःहून शोधलं नाही तर मग भाड्याची उत्तरं मिळवली जातात. जसं की सध्या समाजामध्ये जे प्रचलित आहे किंवा ज्या  प्लेसमेंटला, पॅकेजला , करीअर ट्रॅकला सध्या समाजात वाव आहे, तेच मी करायचं अशी एक आंधळी मनोवृत्ती बळावताना दिसते. हे माझ्या मते धोकादायक आहे. म्हणूनच मला असं वाटतं की पर्पज किंवा हेतू मिळणं हे तरुण म्हणून आपल्या जीवनाचं एक अत्यंत महत्त्वाचं उद्दीष्ट आहे, अत्यंत महत्वाची संधी आणि जबाबदारी पण आहे. आणि म्हणून केवळ माहिती आणि कौशल्याच्या पलीकडे जाऊन, हेतू मिळावा म्हणून तरुण मुलामुलींना कशी मदत करता येईल या उद्देशाने खरंतर आमही निर्माण या प्रकल्पाची रचना केली.

आता सध्या निर्माणची दहावी बॅच सुरू आहे आणि  येणाऱ्या अकराव्या बॅचची निवड प्रक्रिया चालू आहे. त्याच्याविषयीचे तपशील तुम्हाला आमच्या वेबसाईटवर मिळून जातील (www.nirman.mkcl.org)

तर महत्वाचा मुद्दा हा आहे, की जेव्हा तरुण मुलंमुली आपला हेतू शोधतात तेव्हा त्याच्यामुळे नेमकेपणा येतो. हे सगळं शेवटी कशासाठी, याचं उत्तर मिळायला मदत होते आणि त्याच्यामुळे अर्थातच आपल्या जीवनाचं सुकाणू हे असं भरकटत नाही आणि सगळ्या कामाला, तयारीला एक विशिष्ट धार येते, स्पष्टता येते.




मानसशास्त्राच्या साहित्याचा जर आपण अभ्यास केला तर असं दिसतं की तरुण वयामध्ये हेतू सापडणं हे दीर्घकालीन स्वास्थ्याचे उत्कृष्ट द्योतक आहे. म्हणजे तुम्ही तुमच्या  ४५व्या किंवा ५०व्या वर्षी  उत्तम स्तिथीमध्ये असाल का, याचं जर मला २० वर्षाआधी, तुमच्या तारूण्यामधला एखादा सूचक बघायचा असेल तर तो हा की तरूण वयामध्ये तुम्हाला काही लायक हेतू सापडला आहे का. असा हेतू जास्तीतजास्त तरुण तरुणींना मिळावा म्हणून खरंतर आम्ही निर्माणच्या उपक्रमाची रचना केली.

आता माझ्या वैयक्तीक बाबतीत बोलायचं झालं तर मी माझं संगणक अभियांत्रिकीचं शिक्षण झाल्यानंतर सिमॅन्टेक नावाच्या कंपनीमध्ये काही काळ काम केलं. मजेशीर जॉब होता, भरपूर पगार होता. थोडक्यात एका अतिशय मोठ्या सॉफ्टवेअर कंपनीमध्ये जे काही अतिशय लाडावणारं वातावरण असतं, तशा प्रकारचं सगळं होतं. तेव्हा मात्र माझ्या मनामध्ये काही प्रश्न उपस्थित झाले. की हे सगळं मी का करतोय? याचा उपयोग नेमका कोणाला आहे? मला असंच करण्यात माझ्या आयुष्याची पुढची ४०-५० वर्ष घालवायची आहेत का? की मी कोणाचं काहीतरी लागतो आणि माझ्या लोकांप्रती काही जबाबदारी आहे व मी त्यांना काही देणं लागतो का?

त्या प्रश्नाने भरपूरच मूळ धरलं. सोबत मला असंही वाटायला लागलं की मला माझ्या जीवनामध्ये तेजस्वी अशा व्यक्तींसोबत काम करायचं आहे ज्यांनी जीवनामध्ये समाजासाठी काहीतरी केलेलं आहे. असं काम करायचं आहे की ज्यामुळे मला बौध्दिक आणि भावनिक समाधान मिळावं.

अशी अनेक कारणं होती की ज्यामुळे शेवटी मी ठरवलं की ती सिमॅन्टेकची नोकरी सोडायची आणि पूर्णवेळ निर्माणचं काम सुरू करायचं. आणि गेली १२ वर्ष मी ते काम करतो आहे. त्याच्यामागचा माझा जो वैयक्तीक विचार होता तो मी तुमच्यासमोर आता मांडला. पण तो वैयक्तीक विचार माझ्या बाबतीत काहीतरी एक झाला, तुमच्या बाबतीत काहीतरी वेगळा होईल, अजून कोणाच्या बाबतीत काहीतरी वेगळा होईल. ते ठीकच आहे. प्रत्येकाने आपआपला वैयक्तीक प्रवास स्वतः करायला पाहिजे. पण गेल्या काही दिवसांमध्ये माझं अजून एक चिंतन सुरू आहे. जे देखील मला आज तुम्हाला सांगायचं आहे. ते म्हणजे, आपण, आपल्या दैनंदीन जीवनामध्ये कुठेही काम करत असू, समाजासाठी आपण काही करायला पाहिजे का?

*****************************************************************************************

समाजासाठी काहीतरी करणं ही सामाजिक संस्थांची, सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे असं सहसा आपण मानतो. तसं जर असेल तर या सामाजिक क्षेत्राची आख्या व्यवस्थेमध्ये मुळात गरज का उद्भवली? याचा विचार जोपर्यंत आपण करणार नाही, तोपर्यंत सामाजिक क्षेत्राकडे बघण्याची एक प्रगल्भ दृष्टी विकसित होणार नाही आणि मी स्वतः काय करायला पाहिजे हे देखील आपल्याला स्पष्ट होणार नाही. म्हणून त्या बाबतीतीलं काही चिंतन मला आज तुमच्यासमोर मांडायचं आहे.

तुम्हाला कदाचित हे माहितीच असेल की आपल्या समाजामध्ये व्यापकपणे ३ वेगवेगळे क्षेत्र काम करतात. एक म्हणजे अर्थातच शासकीय क्षेत्र, खासगी क्षेत्र आणि तिसरं म्हणजे हे सामाजिक क्षेत्र. हे क्षेत्र म्हणून एका औपचारिक पद्धतीने ओळखणं तर आपण काहीशे वर्षांपूर्वी सुरू केलं. पण जर आपण मनुष्य प्राण्याच्या इतिहासाचा मागोवा घेतला तर तुम्हाला काय वाटतं, सगळ्यात पाहिले कुठलं क्षेत्र अस्तित्वात आलं असेल?

मला स्वतःला असं वाटतं की सगळ्यात पहिलं सामाजिक क्षेत्र, त्यांनंतर कदाचित खासगी क्षेत्र आणि शेवटी शासकीय क्षेत्र आलं असेल. तुम्ही असा विचार करा की आफ्रिकेतला तेव्हाच्या काळातला एक माणूस आहे, जो तिथे सवाना वर फिरतो, किंवा जो तिथल्या गुहांमध्ये राहतो. आज तिथे जसं सरकार आहे तेव्हा तसं नव्हतं, ज्याच्या मध्ये काही निर्वाचित प्रतिनिधी आहेत, निवडणूक होते, पार्लमेंट काहीतरी नीती बनवते, नोकरशाही आहे जी त्याची अंमलबजावणी करते. एक दोन लाख वर्षांपूर्वीपासून हा होमो सेपीयन्स पृथ्वीवर अस्तित्वात आहे. एकूण मनुष्य प्राण्याच्या इतिहासामध्ये अशा प्रकारचं शासन हा अतिशय अलीकडील प्रकार आहे कारण ते फार नंतर आलं.

खासगी क्षेत्र पण नंतर आलं. कारण खासगी क्षेत्रा मध्ये मूळातच एका प्रकारचं आदानप्रदान अपेक्षित आहे. मी कदाचित काहीतरी जास्त चांगलं बनवतोय किंवा माझ्या परिसरामध्ये कुठल्यातरी गोष्टींचा जास्त सुकाळ आहे म्हणून हे तर्कसुसंगत आहे की मी त्याच्यावर फोकस करावं, त्या गोष्टी बनवाव्यात आणि त्या वस्तू किंवा सेवा मी तुम्हाला द्याव्यात आणि तुमच्याकडचं काहीतरी चांगलं तुम्ही मला द्यावं. ही जी विनिमय अर्थव्यवस्था आहे, पूर्वी बार्टर अर्थव्यवस्था होती आता मॉनेटरी अर्थव्यवस्था आहे, ही देखील काही काळाने पैदा झाली. सुरुवातीला कोण होतं. तर फक्त काही व्यक्तींचा समूह होता. समूहाने टिकून रहावं म्हणून त्यांनी एकमेकांच्या बाबतीतले काही नियम विकसित केले. त्यात एखादा व्यक्ती जर अशक्त आहे किंवा त्याला काहीतरी काम करताना आजार किंवा जखम झाली अशा व्यक्तीची काळजी समूहाने घ्यावी की नाही घ्यावी? समूहातला एखादा व्यक्ती हा कायम परावलंबी असावा की तो एक स्वतंत्र योगदान करणारा नागरिक बनावा म्हणून समूहाने

प्रयत्न करावा? समूहाध्ये नवनवीन गोष्टी आणि सृजनशीलता विकसित व्हावी म्हणून समूहाने प्रयत्न करावा का? समूहाने कशा पद्धतीने एकमेकांशी वागावं, याचे काही मूल्य, नैतिकता किंवा आचारसंहिता, हे समूहाने ठरवावे का?

मला वैयक्तीक असं वाटतं की या सगळया गोष्टी पहिले घडल्यात. म्हणून जर आजच्या औपचारिक क्षेत्राच्या रुपात बोलायचं असेल तर सामाजिक क्षेत्र हे बहुतेक सर्वात जुने, मग खासगी क्षेत्र आणि मग शासकीय क्षेत्र आले जे आपण आज पाहतो. एखादी गोष्ट निव्वळ पहिले आली म्हणून ती जास्त महत्त्वाची आणि बाकीचे कमी महत्वाचे, असं मी म्हणू इच्छीत नाही. पण याच्या मागचा इतिहास काय तो समजून घेतला तर आपल्याला एक दृष्टिकोन प्राप्त होतो म्हणून खरंतर मी हे विवेचन केलं.

हे झालं इतिहासाविषयी. आता आपण सध्याच्या परिस्थितीकडे बघूया. प्रसिद्ध अमेरिकन व्यवस्थापन तज्ञ, पीटर ड्रकर, विसाव्या शतकातले सर्वोत्कृष्ठ व्यवस्थापकीय तज्ञापैकी एक असं त्यांना म्हटलं जातं, त्यांचं एक अतिशय सुंदर पुस्तक आहे, 'मॅनेजिंग द नॉन प्रॉफिट ऑर्गनायझेशन'. त्यात ते असं म्हणतात की शासकीय क्षेत्राचं प्रमुख काम काय आहे तर  समाजातले वेगवेगळे व्यवसाय, वेगवेगळ्या लोकांनी नीट राहावं यासाठीची नीती, कायदे कानून किंवा नियम बनवणं. आपल्याकडे दुर्दैवाने प्रत्येक गोष्टीत शासनाने शिरावं अशाप्रकारची प्रवृत्ती दिसते. खरंतर हा प्रश्न विचारता येईल की शासनाने विमान कंपनी चालवायचं कामच काय आहे. ते खरंतर खासगी क्षेत्राचं काम आहे.

खासगी क्षेत्राचं मुख्य काम काय? तर वेगवेगळ्या आवश्यक अशा वस्तू आणि सेवा, उत्पादित करणे आणि वितरित करणे. मग सामाजिक क्षेत्राचं मुख्य काम काय? तर पीटर ड्रकर असं म्हणतात की 'चेंज्ड ह्यूमन बीइंग '. 'ह्यूमन बीइंग'ची ग्रोथ होते की नाही आणि व्यक्ती आंतरीक दृष्ट्या बदलतो की नाही. तो बदलावा म्हणून प्रयत्न करणं हे सामाजिक क्षेत्राचं सगळयात महत्त्वाचं काम आहे असं पीटर ड्रकर सांगतात.

आता हे तीन क्षेत्र जर आपण नजरेसमोर ठेवले तर आपल्याला लक्षात येतं की आज जेव्हा आपल्या आजूबाजूला बघतो तेव्हा खूप सरमिसळ आणि गल्लत झालेली दिसते. एक क्षेत्र दुसऱ्याचं काम करतो, दुसरा तिसऱ्याचं करतो. मी जे करतो ते माझ्या क्षेत्राला अनुरुप आहे की नाही याविषयी वैचारिक स्पष्टता नसल्यामुळे बऱ्याचदा लोकं सारखे इकडून तिकडे आणि तिकडून तिकडे जात आहेत.

आता तुम्ही असा प्रश्न विचारू शकता की खासगी क्षेत्राने वस्तू आणि सेवा पुरवणं हे त्यांचं काम आहे मग समजा सामाजिक क्षेत्रामध्ये आपण एखादी सेवा पुरवतो तर यांच्या कामामध्ये फरक काय? तर मुद्दा असा की खासगी क्षेत्रामध्ये जेव्हा एखादी सेवा किंवा एखादी वस्तू पुरवली जाते, उदाहरण घ्या, आपण किराणा मालाच्या दुकानात गेलो, तांदूळ विकत घेतला. तर मी तो तांदूळ विकत घेतला व तो माझ्या अपेक्षेनुरूप निघाला आणि त्यावर पैसे मी किराणा दुकानदाराला दिले की आमचा व्यवहार तिथेच संपला. खासगी क्षेत्राच्या दृष्टीने हा अंत आहे. पुढे ते तांदूळ मी खातो की नाही खात, ते मी फेकतो, त्याचा भात बनवला का, चांगला भात बनवला का, मी तो इतर कोणाला दिला का, भात खाऊन माझं आरोग्याचं काही बरं वाईट झालं का - या सगळ्याशी किराणा माल दुकानदाराचा संबंध ही नाही, आणि त्याचं भलं बुरं ही त्याची जबाबदारी पण नाही. थोडक्यात खासगी क्षेत्रामध्ये जेव्हा ती वस्तू दिली जाते आणि बदल्यात पैसे मिळतात तेव्हाच व्यवहार संपतो. मग सामाजिक क्षेत्राचं काम हे निव्वळ वस्तू आणि सेवा पुरवणं नाही किंवा निव्वळ नियम आणि कायदे कानून बनवणं नाही तर मग सामाजिक क्षेत्राचं काम काय? त्याच्यामध्ये आणि माझ्या दैनंदीन जीवनाचा काही संबंध आहे का हे शोधायला पाहिजे. याविषयी बराच विचार करून मी एक ६ मितीय रचना तयार केली आहे. माझं तुम्हाला आवाहन असेल, विचार करून बघा की तुम्ही स्वतः त्याच्यातल्या कुठल्या तरी एका गोष्टीमध्ये बसता का.

तुम्ही स्वतः सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत असाल, तुम्ही उद्या कदाचित शासकीय क्षेत्रात नोकरी कराल किंवा खासगी क्षेत्रामध्ये कराल. कुठेही करा, तो सर्वस्वी तुमचा निर्णय आहे पण माझं व्यावसायिक काम हे त्या क्षेत्राच्या जबाबदारीशी अनुरूप होतंय की नाही आणि त्या पल्याड जाऊन मी समाजासाठी काही योगदान करतोय की नाही याचा विचार मात्र आपल्यातल्या प्रत्येकाने करायला पाहिजे.

तर सामाजिक क्षेत्राचं मुख्य काम काय? ६ मितीय रचना -

**मुद्दा १ - सेवा.**



ज्या ठिकाणी सरकार पोहोचू शकत नाही आणि ज्या ठिकाणी खासगी क्षेत्र पोहोचू इच्छीत नाही, अशा ठिकाणी जीवनावश्यक सेवा पुरवणं. उदाहरणार्थ, अतिशय दुर्गम आदिवासी भाग असेल किंवा एखादी शहरातली झोपडपट्टी असेल. कोरोनाच्या निमित्ताने असंख्य लोकं इकडून तिकडे जात होते त्यांना अडचणी जात होत्या. कधी वादळ येतात. अशावेळेला प्रचंड मोठ्या प्रमाणात दुरावस्था होते. खासगी क्षेत्र सहसा अशा ठिकाणी स्वतःहुन बऱ्याचदा जात नाहीत कारण या काही नफा कमावण्याची संधी असलेल्या जागा नसतात. म्हणून खासगी क्षेत्राला तिथे जाण्यामध्ये नैसर्गिक रस नसतो. शासनाची ती जबाबदारी असते पण बऱ्याचदा शासन पोहोचूच शकत नाही कारण त्यांच्याकडे तसं मनुष्यबळ हे बऱ्याचदा सापडत नाही किंवा ज्याला लास्ट मॅन डिलिव्हरी प्रॉब्लेम म्हणतात, सगळयात शेवटच्या क्षणाला जाऊन आणि त्या टप्प्याला जाऊन डिलिव्हरी करणं हे बऱ्याचदा होत नाही. अशा ठिकाणी सेवा देणे हे सामाजिक क्षेत्राचं महत्त्वाचं काम आहे. आपल्या आजूबाजूला जर तुम्ही बघितलं तर बऱ्याचदा अशा लोकांच्याविषयी आपल्याला खूप छान वाटतं की ज्यांनी अतिशय कठीण परिस्थितीमध्ये गरजू लोकांसाठी काहीतरी केलेलं आहे. इथे फक्त एक फरक लक्षात घेतला पाहिजे की जिथे खासगी क्षेत्र सहसा चांगलं काम करतोय, तिथे कदाचित सामाजिक क्षेत्राने पडू नये. उदाहरणार्थ, एखाद्या गावामध्ये एक सलून आहे. जो कोणी केस कापणारा व्यक्ती जर त्या गावातल्या लोकांच्या अर्थिक परिस्थिती नुसार पैसे घेऊन केस कापून देतो आणि त्यांचं नीट काम चालू आहे तर याच्यात सामाजिक क्षेत्राने पडायची गरज नाही. हे खासगी क्षेत्रासाठी सोडलेलेच उत्तम. मी मुद्दामहून थोडंसं गंमतीशीर उदाहरण घेतलं माझा मुद्दा स्पष्ट करायला. पण अशा अनेक जागा आहेत की जिथे कदाचित आरोग्याची, शिक्षणाची, भुकेची अशा सेवांची गरज आहे. ते पोहोचवणं सामाजिक क्षेत्राचं अतिशय महत्त्वाचं काम आहे.

फरक मात्र लक्षात ठेवायला पाहिजे तो आहे मानसिकतेचा. सेवा पुरवणे ही खासगी क्षेत्राची मानसिकता आहे. सेवा करणे ही सामाजिक क्षेत्राची मानसिकता आहे. मी निव्वळ सेवा पुरवली आता तुझं काय झालं मला घेणं देणं नाही असं म्हणून सामाजिक क्षेत्राला चालणार नाही. त्या सेवेद्वारे त्या माणसाचं दुःख दूर होतंय का, हे बघणं सामाजिक क्षेत्रासाठी अतिशय महत्त्वाचं असेल.


**मुद्दा २ - व्यक्तींना सक्षम करणं.**



'एंपावर' हा शब्दच बघा, 'पावर' पासून आलेला आहे. खासगी क्षेत्राकडे आर्थिक पावर आहे. शासकीय क्षेत्राकडे राजकीय, नोकरशाहीची आणि संसाधन वाटपाची पावर आहे. सहसा असं दिसेल की हे दोन्ही क्षेत्र त्या शक्तीला पकडून ठेवतात. नागरिकांनी निव्वळ मतदार किंवा निव्वळ ग्राहक बनून रहावं, बाकीचं आम्ही बघून घेऊ, अशा प्रकारची मानसिकता सहसा दिसते. अर्थात दुर्मिळ अपवाद आहेतच.

हे शक्तीचे असंतुलन दूर करून लोकांना सक्षम करणं, जेणेकरुन ते स्वतः त्यांचे प्रश्न सोडवू शकतील किंवा स्वतः त्यांच्या जीवनाचा सुकाणू हातात घेऊ शकतील. अशा प्रकारचे माणसांचे सक्षमीकरण ज्याला पीटर ड्रकर म्हणतो 'चेंज्ड ह्यूमन बीइंग'. चेंज कुठल्या पध्दतीचा? फक्त चेहरा चेंज करणं हे अपेक्षित नाही. त्या व्यक्तीला आत्मनिर्भर बनवणं. त्याच्यातल्या पोटेन्शियलला पूर्णत्वाने बाहेर काढता येणं या प्रकारचा 'चेंज्ड ह्यूमन बीइंग' अपेक्षित आहे. ह्यूमन बीइंग ना सक्षम करणं हे सामाजिक क्षेत्राचं दुसरं आणि अतिशय महत्त्वाचं, गाभा म्हणता येईल असं काम आहे. म्हणून मी परत म्हणेन की तुम्ही कुठल्याही क्षेत्रात काम करत असा, हे बघायला पाहिजे की माझ्या कामाच्या द्वारे मी निव्वळ परावलंबित्व पैदा करतोय की ज्या कोणासोबत काम करतोय त्यांच्यामध्ये काही आंतरिक बदल आणि क्षमता विकास घडवून आणतो आहे, हा विचार आपल्या सगळ्यांनी केला पाहिजे.

**मुद्दा ३- सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ते नाविन्यपूर्ण प्रयोग करणे.**



म्हणजे आपल्या अवतीभवती जे अनेक सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व तांत्रिक प्रश्न आहेत यांच्यावर नाविन्यपूर्ण उपाय काढणे, नवनवीन पायलट करणे. कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये त्रैमासीक नफ्याचं दडपण असतं आणि शासकीय नोकरशाही मध्ये बऱ्याचदा लाल फितीचा एक अडथळा असतो. सामाजिक क्षेत्राला सुदैवाने या दोन्हींचं तितकं दडपण नसतं. म्हणून काही प्रमाणातली जी लवचिकता सामाजिक क्षेत्राला मिळते किंवा मिळू शकते, त्याचा वापर करून आपल्या अवतीभवतीच्या प्रश्नांना सोडवण्यासाठी सर्जनशील समस्या निवारण कसे करता येईल याचा ध्यास घेणे. एक उदाहरण बघूया. तुमच्यापैकी अनेकांनी डॉ.अभय बंगांचं नाव ऐकलं असेल. ग्रामीण भागामध्ये बालमृत्यू कमी करण्यासाठी घरोघरी नवजात बाळसेवा म्हणजेच होम बेस्ड न्यू बॉर्न केअर- नावाचं एक प्रारूप त्यांनी विकसित केलं. दूसरीकडे राजस्थान मध्ये जिथे पाण्याचा मोठया प्रमाणात तुटवडा होता, तिथे राजेंद्र सिंगांनी जोहड हे प्रारूप विकसित केलं. जवळचं एक उदाहरण म्हणजे निर्माणमधलाच आमचा मित्र अश्विन पावडे. नुकतेच त्यांना अतिशय प्रतिष्ठेचं Ashden पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी सोलार ड्रायर विकसित केले आहे ज्याच्या माध्यमातून शेतकरी त्यांच्या मालाला जास्त काळ जतन करू शकतील. अशी अनेक उदाहरणं देता येतील ज्यामध्ये एक वेगळा, सर्जनात्मक आणि सृजनात्मक विचार करून आपल्या अवतीभवतीची प्रश्न सोडवण्यासाठी नवीन मॉडेल किंवा पद्धत तयार केलेली आहे. हे करणं अतिशय आवश्यक आहे. यामध्ये मात्र एक काळजी घ्यायला पाहिजे. जिथे आपलं भारतीय मानस मला वाटतं बऱ्याचदा आळशीपणा करतं. ते म्हणजे

फार चटकन यशाचा दावा करणं. आपण थोडं काहीतरी करतो आणि लगेच त्याला हे यशस्वी मॉडेल आहे, असं म्हणून प्रस्तुत करायला जातो. ही मला असं वाटतं की एकतर पळवाट आहे आणि दुसरं म्हणजे हा बौद्धिक प्रामाणिकपणा नाही. म्हणून जर आपण इतरांना कधी शिफारस करणार असू की हे मॉडेल आहे किंवा हा मी एक नाविन्यपूर्ण उपाय काढलेला आहे, हे काम करतं, तर आपल्याला दाखवावं लागेल की ते खरंच काम करतं. मग त्यासाठी आवश्यक तसे वेगवेगळे प्रश्न स्वतःला विचारणे, आपलं मॉडेल किंवा शोध त्या वेगवेगळ्या कसोट्यांवर घासून बघणे हे आपण नक्कीच करायला पाहिजे. तर अशा प्रकारचे नाविन्यपूर्ण उपाय काढणे हे सामाजिक क्षेत्राचं तिसरं महत्त्वाचं काम.

**मुद्दा 4 - 'व्हिसल ब्लोअर'.**



समाजामध्ये जेव्हा जिथे अन्याय घडत असेल, मग तो पर्यावरणावर असेल, व्यक्तींवर असेल, प्राण्यांवर असेल, अशा अन्यायाला वाचा फोडणे आणि जागल्या म्हणून काम करणे, ही सामाजिक क्षेत्राची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे.

शासनाचे किंवा खासगी क्षेत्राचे कधी कधी हितसंबंध आड येतात. क्वचित प्रसंगी असं होऊ शकतं की कुठे भ्रष्टाचार होतोय, कुठे पर्यावरणीय नियमांचे पालन होत नाही, कुठे एखादं धरण किंवा पूरग्रस्त लोकांना विस्थापित करून, त्या बदल्यात दिलेली अश्वासन पाळले जात नाही. अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी येऊ शकतात. याच्याविरुद्ध 'व्हिसल ब्लोअर' म्हणून काम करणे हे अतिशय महत्वाचं काम आहे जे सामाजिक क्षेत्राने करायला पाहिजे.



**मुद्दा 5 - आपल्या समाजामध्ये सुदैवाने अनेक लोकांना असं वाटतं की मी इतरांसाठी काहीतरी करायला पाहिजे.** ही खरंतर अतिशय आशादायक गोष्ट आहे. पण ते इतर कोण? त्यांच्यासाठी मी नेमकं काय करणार? पैसे, वेळ, जेवण, कपडे देणार की अख्ख जीवन देणार? हे फरक असू शकतात. पण सहसा याला एखादा संरचित व्यासपीठ किंवा व्यक्त होण्याचे माध्यम मिळत नाही. हे जर अतिशय कठीण बनून गेलं तर इतरांना मदत करणं हे कमी होणार आहे. म्हणून समाजातल्या अनेक लोकांमधला, इतरांना मदत करण्याचा जो भाव आहे याला सहज साध्य असं आऊटलेट मिळावं याच्यासाठी मदत करणं, यासाठीचं व्यक्त होण्याचे माध्यम किंवा व्यासपीठ बनणं हे सामाजिक क्षेत्राचं अतिशय महत्वाचं काम आहे. एक उदाहरण म्हणून सांगतो. आम्ही गडचिरोलीला सर्च नामक संस्थेच्या माध्यमातून काम करतो. वेगवेगळे उपक्रम आम्ही इथे करतो त्याच्यातलं एक म्हणजे आम्ही उत्तम आणि सुसज्ज असं हॉस्पिटल पण चालवतो. साधारण वर्षाला ५०,०००-५५,००० रुग्ण इथे येतात. आमच्या हॉस्पिटलमध्ये कायमस्वरूपी काम करणारे सहकारी डॉक्टर निवडकच आहेत. जेमतेम १० डॉक्टर असतील जे सर्च संस्थेचा कायमस्वरूपी भाग म्हणून काम करतात. गमतीची गोष्ट अशी की या १० डॉक्टरांपैकी एकही जण सर्जन किंवा अनेस्थेटिस्ट नाही. तरीदेखील दर वर्षाला आम्ही आमच्या हॉस्पिटलमध्ये साधारणतः ६००-७०० उत्तमोत्तम, कठीणात कठीण शस्त्रक्रिया करतो. त्याचा गडचिरोलीतल्या आणि आजूबाजूच्या वेगवेगळ्या आदिवासी आणि ग्रामीण भागातल्या लोकांना फायदा होतो. ह्या शस्त्रक्रिया कशा घडतात? तर सुदैवाची आणि आनंदाची बाब ही की महाराष्ट्रभरातल्या मग ते नागपूर-अकोला पासून पुणे- मुंबई पर्यंत, नाशिक- जळगाव पासून कोल्हापूर पर्यंत वेगवेगळ्या ठिकाणचे अनेक उत्तमोत्तम सर्जन व अनेस्थेटिस्ट ज्यांना असं वाटतं की आम्हाला समाजासाठी काहीतरी करायचं आहे ते आमच्यासोबत जोडले गेलेले आहेत.

दर काही महिन्यांच्या अंतराने ते आमच्याकडे येतात. सर्जरी कॅम्प आखलेले असतात त्यात रुग्ण आम्ही पहिलेच निवड करून ठेवलेले असतात, बकायदा सगळ्या प्रक्रिया होतात आणि इथे सर्जिकल केअर मिळते. हे सगळे सर्जन यासाठी एक पैसा देखील मोबदला घेत नाहीत. हे एक छोटं पण अतिशय सूचक उदाहरण आहे. त्या सर्जन अनेस्थेटिस्ट ना आधीच वाटत होतं की मला समाजासाठी काहीतरी करायचं आहे. गरजू ठिकाणी जाऊन ते ते कार्य करू शकतील अशाप्रकारचा व्यासपीठ सर्चच्या हॉस्पिटलच्या निमित्ताने जर त्यांना उपलब्ध झाला, तर मणक्याच्या शस्त्रक्रियेपासून हायड्रॉसिल-हर्निया पर्यंत, हिस्टरेकटॉमी-थायरॉईड पासून प्लास्टिक सर्जरी पर्यंत, अनेकाधिक अतिशय प्रगत शस्त्रक्रिया इथे गडचिरोली मध्ये होऊ शकतात ज्याचा गरजू लोकांनाही फायदा होतो आणि त्या सर्जनला देखील मी योगदान केलं याचं समाधान मिळतं. अशा प्रकारचा वेगवेगळ्या बाबतीत ब्रीज बनून काम करणं  ही देखील सामाजिक क्षेत्राची महत्त्वाची जबाबदारी आहे.

**मुद्दा 6 - हा मूल्यात्मक आहे**. सामाजिक क्षेत्रामध्ये आपण कितीही कृती केल्या तरी त्या कृतीचा आवाका हा काही प्रमाणात का होईना मर्यादित राहणार आहे. शासकीय व्यवस्थेला जशी अख्ख्या देशामध्ये स्केल उपलब्ध आहे किंवा खासगी क्षेत्रामध्ये, उदाहरणार्थ कोका-कोला, अशा कंपनीला जी एक आंतरराष्ट्रीय व्याप्ती प्राप्त होते अशी सामाजिक क्षेत्राला प्राप्त होणं अतिशय दुरापास्त आहे. मला वाटतं की ते सामाजिक क्षेत्राचं लक्ष्य देखील नसावं. म्हणून कृतीचा आवाका एका मर्यादेपलीकडे वाढवणं सामाजिक क्षेत्राचा मानक किंवा मानदंड नसावा. त्या कृतीच्या माध्यमातून मी काय वृत्ती प्रसारित करतोय, ती वृत्ती व मूल्य, हे सामाजिक क्षेत्रासाठी अतिशय महत्त्वाचं आहे. मी एक उदाहरण घेईन - अण्णा हजारे. मला स्वतःला अण्णांना व्यक्तिशः राळेगणसिद्धी मध्ये जाऊन भेटण्याचा योग आला. अतिशय समाधानकारक आणि उत्साहित करणारा असा तो अनुभव होता. त्यावेळेला अण्णांचं वय ६८ वर्ष होतं. पण इतका उत्साह त्यांच्यामध्ये! राळेगणसिद्धीमधल्या, यादवबाबा मंदिरामधल्या एका छोट्याशा खोलीमध्ये अण्णा राहतात. तिथे जवळपास अशी कुठलीच वस्तू नाही जी ते स्वतःसोबत ठेवतात. मात्र ते जेव्हाही काही बोलतात किंवा आवाहन करतात तेव्हा देश का हलतो? याचं कारण मला असं वाटतं की हा एक वृद्ध व्यक्ती स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ही सूचना देतोय की मी भ्रष्टाचारापुढे, सत्तेपुढे दबणार नाही, जे मला योग्य वाटतं त्याच्यासाठी मी काम करेन, अतिशय साध्या पद्धतीने आणि चारित्र्यवान जगेन. अण्णांच्या निमित्ताने ही मूल्य प्रसारित होतात. अण्णांचं मी एक उदाहरण घेतलं, तुम्ही नेल्सन मंडेला पासून मार्टिन ल्युथर किंग पर्यंत कुठलंही दुसरं उदाहरण घेऊ शकता. अर्थातच ही खूप मोठी माणसं झाली. आपण सगळे अतिशय छोटी माणसं आहोत. मात्र आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आणि आपल्या कामातून आपण कुठली वृत्ती प्रसारित करतो हे अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. इथे देखील सामाजिक क्षेत्राला एक मोठी भूमिका निभावायची गरज आहे. सुदैवाने जुन्या काळामध्ये ज्या प्रकारचे राजकीय नेते होते ते राजकारणासोबत एक मूल्यात्मक पायंडा पण पाडायचे. समाजाला प्रेरणा देतील अशा प्रकारचं राजकीय नेतृत्व त्या काळात होतं. मग ते गांधीं- नेहरूंचं असोत की जयप्रकाश नारायणांचं किंवा महाराष्ट्रामध्ये यशवंतराव चव्हाण असोत की बाकी अनेकजण असोत. आजकाल दुर्दैवाने आपल्याला असं दिसतंय की राजकीय नेतृत्वाची मूल्यात्मक विश्वासार्हता संशयास्पद झालेली आहे. अपवाद असले तरीही बहुतांश बाबतींमध्ये. खासगी क्षेत्रामध्ये अतिशय कमी उदाहरणं आहेत ज्यांच्याकडे आपण मूल्यात्मक नेतृत्व म्हणून बघू शकतो. म्हणूनच सामाजिक क्षेत्राला ही पोकळी भरून काढणं अतिशय आवश्यक आहे.





एकदा फक्त पुनरुच्चार करायला म्हणून ही ६ मितीय रचना परत बघूया -

पहिलं होतं सेवा, दुसरं होतं माणसांना सक्षम करणे( चेंज्ड ह्यूमन बीइंग) तिसरं होतं नाविन्यपूर्ण प्रयोग अथवा पायलट करणे, चौथं होतं जागल्या म्हणून किंवा 'व्हिसलब्लोअर' म्हणून काम करणे, पाचवं होतं इतरांना मदत करण्यासाठी व्यक्त होण्याचे माध्यम आणि संघटित व्यासपीठ लोकांना उपलब्ध करून देणे आणि सहावं म्हणजे मूल्य आणि तत्त्व यांची प्रतिष्ठापना करणे जी समाजापुढे वारंवार येत राहतील आणि ज्याद्वारे एकूणच समाजाला ऊर्ध्वगामी मार्ग पत्करण्यासाठी प्रेरणा मिळेल. हे सामाजिक क्षेत्राच्या अस्तित्वाचे फार महत्त्वाचे घटक आहेत.

हे सगळं मी इतक्या विस्ताराने तुम्हाला याच्यासाठी सांगितलं कारण प्रेरणेचा प्रवास असा जेव्हा विश्वाधर देशमुखांनी मला विषय दिला तेव्हा माझी स्वतःची वैयक्तीक प्रेरणा काय हे माझ्यासाठी महत्त्वाचं आहेच म्हणून त्याचा मी थोडक्यात उल्लेख केला. मात्र नंतर मला स्वतःला हा प्रश्न पडायला लागला की मी किती दिवस माझी प्रेरणा, माझं मोटिवेशन, माझी रुची एवढंच घेऊन बसू? शेवटी या सगळयातून मी ज्या प्रकारचं काम करायचं म्हणतोय ती व्यापक प्रेरणा काय आहे? जी अमृत बंगच्या पलीकडे जाते किंवा कोणाही एक व्यक्तीच्या पलीकडे जाते? माझ्या याच चिंतनातून मला ही ६ मितीय रचना मिळाली ज्यावर मी विश्वास ठेवतो. समाजात हे घडायला पाहिजे असं मला वाटतं आणि म्हणून मी काम करतो. माझा असा आग्रह नाही की तुम्हाला हीच रचना पटायला पाहिजे पण या निमित्ताने कदाचित तुमचा विचार प्रबळ व्हायला मदत होईल आणि तुम्ही स्वतःसाठी असं काहीतरी वेगळं उत्तर शोधू शकाल अशी मला आशा वाटते. म्हणून इतक्या विस्ताराने मी तुम्हाला हे सांगितलं.

आपल्यापैकी काही लोक सामाजिक क्षेत्रामध्येच पुर्णवेळ जातील, काही खासगी क्षेत्रामध्ये जातील तर काही लोक शासकीय क्षेत्रामध्ये जातील. ज्या ही क्षेत्रामध्ये आपण जाऊ, त्याचं जे मूळ काम आहे, ते इमानेइतबारे आणि अतिशय चांगल्या पद्धतीने करणं हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे जो आपण सगळयांनी केला पाहिजे. दुसरा मुद्दा की कुठल्याही क्षेत्रामध्ये का असेना, मी समाजाला काही योगदान करू शकतो का? प्रत्येकाने बाबा आमटे, अभय बंग, प्रकाश आमटे, राजेंद्र सिंग किंवा अण्णा हजारे ह्यांच्यासारखं आयुष्यच झोकलं पाहिजे असं गरजेचं देखील नाही. काही लोकं तसंही करतील, पण काही लोकांनी तसं नाही केलं, आपली रोजची दिनचर्या सांभाळून देखील योगदान केलं तरी चालेल. पण हे नेमकेपणे आणि चांगल्या पद्धतीने करणं आवश्यक आहे. त्यासाठी ही स्पष्टता पाहिजे की समाजामध्ये सामाजिक क्षेत्र अस्तित्वात असणं, सक्षम होणं आणि त्याच्याद्वारे आपण एकमेकांची काळजी घेणं, जो अशक्त आहे त्याची काळजी घेणं किंवा समाजामध्ये चांगल्या प्रकारे समृद्धी प्रस्थापित होणं, केवळ भौतिक समृद्धी नाही तर सौंदर्यदृष्टीची समृद्धी प्रस्थापित होणं महत्वाचं आहे. समजा कला विषयांचा विद्यार्थी किंवा प्राध्यापक आहे किंवा कलाकार आहे, तो जेव्हा त्याचं काम छान करतो आणि ते लोकांपर्यंत पोहचवतो, तेव्हा देखील माणसं सक्षम होतात. तेव्हा देखील ह्युमन बीइंग हे सांसारिकच्या ऐवजी काहीतरी उन्नत कडे जायला उदयुक्त होतात.

त्यामुळे आपल्या कामामधून आपण समाजाला अधिक चांगलं बनवण्यासाठी काय करू शकतो याचा ध्यास आपल्यातल्या प्रत्येकाने घेतला पाहिजे. तुम्हाला रस असेल तर मी २-३ लेख सुचवेन. एक विनय हर्डीकरांचं 'सुमारांची सद्दी' नावाचा लेख आहे. एक सुहास पळशीकरांचा 'आखूड लोकांचा प्रदेश' म्हणून लेख आहे. दोन्ही खूप छान आहेत. बऱ्याच बाबतीमध्ये आपल्या आजूबाजूला उथळपणा चालू आहे, यावर त्या दोघांनी खूप सुंदर विवेचन केलेलं आहे. मी जे काही काम करेन त्याच्यामध्ये उत्कृष्टता कशी आणेन, त्याच्यामध्ये मी सौंदर्य कसं आणेन आणि त्याद्वारे मी इतर लोकांच्या भल्यासाठी काय करेन, याचा ध्यास जर आपल्यातल्या प्रत्येकाने घेतला तर अतिशय चांगलं होईल. माझ्या स्वतःचा आणि निर्माणचा आमचा जो प्रेरणेचा प्रवास आहे त्याचं देखील एक अतिशय सुयोग्य असं रुपांतर त्याच्यामध्ये घडेल.

आज या निमित्ताने तुम्हा सगळ्यांशी बोलण्याची संधी मिळाली याच्याबद्दल विश्वाधर देशमुख यांचे पुनःश्च अगदी मनापासून आभार. आमच्या निर्माणच्या उपक्रमाविषयी तुम्ही www.nirman.mkcl.org या वेबसाईट वर नक्कीच बघू शकता. आमच्या युट्यूब चॅनेलवर वर देखील अनेक वेगवेगळ्या वैचारिक नेत्यांचे आणि सोशल चेंजमेकर चे व्हिडिओ टाकलेले आहेत ते ही जरूर बघा. निर्माणच्या प्रवासातून प्रेरणा घेऊन जवळजवळ ३९० मुलंमुली असे आहेत की ज्यांनी पूर्ण वेळ कुठल्यातरी सामाजिक प्रश्नाला घेऊन सोडवण्यासाठी काम केलं आहे. त्यांच्यातल्या अनेकांच्या कथा आमच्या वेबसाईट वर आहेत. अनेक सुंदर लेख, सुचवलेली पुस्तके देखील आहेत. त्या सगळ्याचा तुम्हाला उपयोग झाला तर तो तुम्ही अगदी जरूर करून घ्या अशी माझी तुम्हाला विनंती.

माझा हेतू काय आणि माझ्या हेतूच्या माध्यमातून मी इतरांना कसं योगदान करू शकतो ही वैयक्तिक प्रेरणा आणि त्या वैयक्तिक प्रेरणेच व्यापक स्वरूप असं मार्गक्रमण आपल्यातल्या प्रत्येकाचं व्हावं अशी शुभेच्छा. धन्यवाद.



- अमृत बंग

प्रकल्प संचालक, निर्माण
सर्च, गडचिरोली – 442605
www.nirman.mkcl.org
contact.nirman@gmail.com